ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जुलै ते सप्टेंबर २०२२

## समीक्षक वसंत दिगंबर कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विनम्र अभिवादन





## संस्थात्मक कामासाठी कार्यनिष्ठा आणि ज्ञाननिष्ठा महत्त्वाची : डॉ. राजा दीक्षित

'संस्थात्मक कामासाठी कार्यनिष्ठा आणि ज्ञाननिष्ठा महत्त्वाची असते. डॉ गं.ना. जोगळेकर यांच्याकडे ती होती म्हणून त्यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेसाठी केलेल्या कामाचा ठसा उमटला, 'असे मत महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजा दीक्षित यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने डॉ. गं. ना. जोगळेकर स्मृती पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक अरविंद गोखले यांना डॉ. दीक्षित यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी होते. कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, कार्यवाह बंडा जोशी, पराग आणि उज्ज्वला जोगळेकर या वेळी उपस्थित होते. रोख रक्कम, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

गोखले म्हणाले, 'पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करताना समाजजीवन खूप जवळून पाहायला मिळाले. जयंतराव टिळक, चंद्रकांत घोरपडे अशा संपादकांच्या समवेत काम करताना खूप शिकायला मिळाले. केलेला अभ्यास आणि संशोधन पुस्तकं लिहिण्यासाठी उपयुक्त ठरले. हा पुरस्कार आजवर केलेल्या कामाची पावती आहे.' अध्यक्षीय समारोप करताना प्रा. जोशी म्हणाले, 'अरविंद गोखले यांनी व्यासंगी आणि तत्त्वनिष्ठ संपादक आणि अभ्यासू लेखक म्हणून आपला ठसा उमटविला आहे. केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी काम करणाऱ्या व्यक्ती संस्थेतील पदावरून गेल्या की, त्या संस्थेच्याही स्मरणात राहत नाहीत आणि समाजही त्यांना लक्षात ठेवत नाही. डॉ. जोगळेकर सर्वांच्या स्मरणात आहेत कारण त्यांनी संस्थेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले.'

सुनिताराजे पवार यांनी आभार मानले. बंडा जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

येणें वाग्यज्ञे तोषावे

महाराष्ट्र
साहित्य
परिषद

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३७९, जुलै ते सप्टेंबर २०२२

संपादक । **डॉ. पुरुषोत्तम काळे**

प्रकाशक । **प्रकाश पायगुडे** प्रमुख कार्यवाह

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**
४९६ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ४११०३०.
दूरभाष । ०२०-२४४७५९६३
संकेतस्थळ । www.masapapune.org
ई-मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।
सकाळी ९.०० दुपारी १२.००
दुपारी ४.३० ते रात्री ८.००

# मसाप पत्रिका
# एप्रिल ते जुलै २०२२
# अंक ३७९

संपादक
**डॉ. पुरुषोत्तम काळे**

मुद्रक–प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्य**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मुद्रणस्थळ
**एस. ए. प्रिंटर्स,**
फ्लॅट नं. ५, ३ रा मजला,
सिद्धीविनायक अपा.,
शिवदर्शन, पुणे ४११००९

मूल्य : **१५ रुपये**



या अंकात व्यक्त झालेल्या
विचारांशी संपादक, संपादन समिती,
सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक
सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग


१) ९६ व्या अ. भा. म. सा. संमेलनाध्यक्षपदी न्या. नरेंद्र चपळगावकर यांची निवड :
विवेकी ज्ञानतपस्व्याचा सन्मान.। **डॉ. पुरुषोत्तम काळे** । ७

२) साहित्य क्षेत्रातील अक्षय चांदणे डॉ. व. दि. कुलकर्णी । **डॉ. मेधा सिधये** । ९

३) आधुनिक काळातील साने गुरुजी । **सुरेश देशपांडे** । १४

४) प्राचीन मराठी ग्रंथातील विनोदाचे स्वरूप । **प्रा. डॉ. वर्षा तोडमल** । १७

५) राजारामशास्त्री भागवत यांचा स्त्रीविचार । **डॉ. मनीषा खैरे** । २१

६) नाटकांचे पुनरुज्जीवन आवश्यक आहे का? । **मिलिंद शिंदे** । २९

७) मराठी प्रायोगिक नाटकांचे स्वरूप आणि विचार । **प्रा. डॉ. संजय लांडगे** । ३२

८) राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि कोल्हापुरातील मुस्लीम समाज । **श्री. संदीप वसंतराव जाधव** । ३७

९) लिंगभाव संकल्पना आणि स्वरूप । **निकिता अनिल शेंडगे** । ४२

१०) 'आलोक'चे भाषिक सामर्थ्य । **डॉ. सुधीर बब्रुवान मोरे** । ४६

११) फ्रेंच लेखक रोलां बार्थ मराठीत समजून घेताना...। **डॉ. मिलिंद कसबे** । ४९

१२) विज्ञानकथा : स्वरूप आणि संकल्पना । **ज्योत्स्ना शिवाजी खंडागळे** । ५६

१३) नुसातं : शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक संघर्षाची अनाथ जीवनगाथा । **संदेश ढोले** । ६०

१४) ग्रामीण समस्यांशी समरस होणारा कथासंग्रह : अवकाळी विळखा । **डॉ. राजेंद्र थोरात** । ६७

१५) 'नाही गिरवता येत कुठलीच लिपी' जगण्याच्या सर्व शक्यता आजमावणारी कविता' । **दा.गो. काळे** । ७१

१६) कविवर्य शंकर रामाणी यांच्या कवितेचा समग्र आणि चिकित्सक आढावा । **प्रा. विनायक ल. बापट** । ७४

१७) 'तळमळीचा तळ' अजीम नवाज राही ह्यांचा शब्दाविष्कार । **किरण शिवहर डोंगरदिवे** । ७८

१८) अंतरीच्या अस्वस्थ कल्लोळाची कविता : । **प्रा. डॉ. अरुण कोळेकर** । ८४

१९) 'समतेचा ध्वज' उंचावणारी कविता । **डॉ. नवनाथ तुपे** । ९२

२०) कादंबरीला नवा आयाम प्राप्त करून देणारी
कादंबरी म्हणजे शेवटची लाओग्राफिया ही कादंबरी । **प्रा. डॉ. संजय नगरकर** । ९७

२१) ब्र कादंबरीतील सांस्कृतिक लिंगभावात्मक राजकारण । **डॉ. गजानन विठ्ठलराव भोसले** । १०१

२२) कादंबरी चिकित्सा एकेक पान गळावया–गौरी देशपांडे । **शिल्पा संजय कुंभार** । १०९

२३)  नव्या आयामांची मांडणी करणारी कादंबरी : वंदे मातरम्  । **प्रा. विजयकुमार खंदारे । ११३**

२४)  भुरा; बुद्धिजीवी प्रवाशाची आत्मकथा  । **डॉ. नाना झगडे । ११७**

२५)  वास्तवाचे भान देणारी : 'थिजलेल्या काळाचे अवशेष'  । **डॉ. प्रकाश शेवाळे । १२१**

२६)  आ.ह. साळुंखे यांचे 'तुकारामाचा शेतकरी' विषयक चिंतन  । **शुभम गजानन बुटले । १२९**

२७)  गोफणबाज कविता : 'आठ फोडा आन बाहेर फेका'  । **अरुण चव्हाळ । १३३**

२८)  लोकशाहीर पुंडलिक फरांदे : लोकरंजनातून लोकशिक्षण देणारा लोकशिक्षक ।
**प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात । १३७**

२९)  'युद्धरत : युद्धाकडून बुद्धाकडे जाणारी कालातीत कविता' । **सविता कुरुंदवाडे ।१४१**

३०)  सातपुड्यातील आदिवासी तडवीची लग्नगीते  । **मुकेश एकनाथ सावळे । १४६**

३१)  विवेकाचे वारसदार : डॉ. नरेंद्र दाभोलकर  । **भिकचंद सखाहरी लांडे । १५०**

३२)  वसंत नरहर फेणे यांच्या 'आकाशपुष्प' या कथेचे मानसशास्त्रीय आकलन ।
**सीमा अशोक कदम । १५४**

३३)  सकारात्मक ऊर्जेचा आविष्कार : 'मोशनल मोटिव्हेशनल आणि इमोशनल' ।
**प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे । १५९**

३४)  अक्षय प्रेमाचे मागणे मागणारी कविता ...। **वर्षा मारुती भिसे । १६२**

३५)  व्यवस्थेची चिरफाड करणाऱ्या : 'शिक्षणाच्या कविता' । **डॉ. सुरेश सावंत । १६५**

३६)  मराठी साहित्यातील वडार समाज : सांस्कृतिक दर्शन  । **अनिल सतिश गोटे । १६९**


३७)  मराठी विज्ञानकादंबरी : स्वरूप आणि वाटचाल  । **डॉ. रवींद्र शिंदे । १७३**

३८)  शाखा कार्यवृत्त  । **१७८**

## वास्तवाचे भान देणारी कादंबरी :

# थिजलेल्या काळाचे अवशेष

**डॉ. प्रकाश शेवाळे**




पुस्तकाचे नावः **थिजलेल्या काळाचे अवशेष**
लेखिकाः **नीरजा**
प्रकाशनः **राजहंस प्रकाशन प्रा. लि.**
प्रथम आवृत्ती : **ऑगस्ट २०२२**
पृष्ठ : **२५५**
मूल्यः ४००/-रु.

कवयित्री नीरजा यांची 'थिजलेल्या काळाचे अवशेष' ही पहिली आजच्या वास्तव सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीच्या वास्तवतेचे उद्‌गार असणारी अतिशय महत्त्वाची कादंबरी. नीरजा यांचे मराठी साहित्य जगतात कथा, कविता व ललित लेख इत्यादी लेखनाने अतिशय भरभक्कम असे स्थान आहे. 'थिजलेल्या काळाचे अवशेष' ही त्यांची पहिली कादंबरी आजच्या मूल्यसंभ्रमाच्या काळात वास्तव जीवन जाणिवांचे व असंवेदनशील वृत्तीचे भेदक चित्रण करून मनात अनेक प्रश्न उपस्थित करते.

आजच्या काळामध्ये राजकीय, सामाजिक ध्रुवीकरण झालं आणि सर्व समाज गटा-तटाच्या राजकारणात विभागला गेला. सख्खं कोण अन् परकं कोण याचा ठाव न येणाऱ्या, मनामध्ये असंख्य प्रश्न निर्माण करणाऱ्या, तसेच मनामध्ये विद्वेष निर्माण करणाऱ्या राष्ट्रवादाचा नीरजा यांनी अतिशय परखडपणे वेध घेतलेला आहे. या कादंबरीचे कथानक, पात्र, व्यक्तिचित्रण, संवादात्मक निवेदन, या कादंबरीतील पात्रांच्या वास्तव भावनांचे झालेले प्रकटीकरण म्हणजेच आत्माविष्कार व कालावकाश या सर्वच बाबतीत ही कादंबरी असंख्य प्रश्न उपस्थित करते व अस्वस्थ करते.

समाजमाध्यमे मानवी मनाला व जगाला प्रभावित करून एकत्र बांधताहेत, तर दुसरीकडे आपल्या तीक्ष्ण असणाऱ्या विचारधारा आपल्याला एकमेकांपासून दूर करत आहेत. जगाची सुमारे २५ टक्के लोकसंख्या म्हणजेच २ अब्ज लोक व्हॉट्सॲप वापरतात. याच व्हॉट्सॲप व फेसबुकच्या माध्यमातून एकत्र आलेला हा सर्व अतिशय



जवळच्या वर्गमित्रांचा गट आहे, की जे ऐशीच्या दशकात जवाहरलाल नेहरू विद्यापीठात शिक्षण घेत असतात. या सर्व मित्रांचा गट व जेएनयु विद्यापीठ हेच या कादंबरीचे केंद्र आहे.

भारतीय जनमानसाच्या मनात असंख्य प्रश्न आहेत हे प्रश्न या कादंबरीतून उपस्थित होताना दिसतात. स्त्रीपुरुष समानता, सामाजिक न्याय, पुरुषी मानसिकता, स्त्रियांचे सोसलेपण, विविध धर्म, जातींपातीचे गट – तट, समलिंगी संबंध, गोवंश, कलम ३७०, पुरस्कारवापसी असे आजच्या काळातील अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा तसेच काही प्रश्न नुसते उपस्थित करून वाचकांच्या मनात वास्तवाचा अवकाश निर्माण केला आहे.

मित्रांना भेटायला आलेली नजमा सर्वांत आधी मुंबईत येते. जगातील अतिशय महत्त्वाचे शहर म्हणजे मुंबई होय. या मुंबईमध्ये राहणारी तिची अतिशय जवळची मैत्रीण मृणाल हिला भेटून नजमाचा हा सर्व प्रवास सुरू होणार आहे. मुंबईत विमानतळावर ती येऊन थांबते येथून कादंबरीची सुरुवात होते. कधीपासून उभी होती नजमा स्मोकिंग झोनमध्ये. जवळजवळ एक पाकीट संपायला आलं होतं, तरी मृणालचा पत्ता नव्हता. फ्लाईटची वेळ बरोबर सांगितली होती ना आपण की, लिहिताना काही घोळ झाला होता?

नजमानं मोबाईल उघडून व्हॉट्सॲप चेक केलं. लँडिंगची वेळ बरोबर दिली होती तिनं. मृणालचा मोबाईल बंद असतो. समाजमाध्यमांवर आलेले संदेश ती बघते आणि आता काय करायचं असा प्रश्न तिच्या मनात निर्माण होतो. येथूनच कथानक खऱ्या अर्थाने वाचकाच्या मनात एक उत्सुकता निर्माण करते. कादंबरी संपल्यावर जी एक असहायता नजमाच्या मनात निर्माण होते अगदी तिथपर्यंत वाचकाच्या मनावरची पकड हे कथानक सोडत नाही.

प्रत्येक घरात जाणारी ही निवेदक कथनकार तेथील स्त्रियांचा असणारा अवकाश व्यक्त करते. मैत्रिणीच्या घरात गेल्यावर तिच्यातला स्त्रीवाद जणू ती तपासते व तिच्या लक्षात येते. मित्राच्या घरी गेल्यावर त्याच्या घरातील असलेल्या स्थिती-परिस्थितीचे अतिशय धीरगंभीरपणे कथन ती करते कारण, आतल्या आणि बाहेरच्या अशा प्रत्येकाच्या भूमिका वा मुखवटे वेगळे असतात प्रत्येकाच्या घरात गेल्यावरच वास्तव समजत जाते. नजमा हे अतिशय हुशार आणि धूर्त असे पात्र यासाठी निवडले आहे. अगदी चेहरा, चेहऱ्यावरचे हावभाव, स्तब्धता यावरून तिला कळते या घरात काय घडले आहे. जात आणि धर्म हा विषय खऱ्या अर्थाने जवळच्या व परिपक्व मित्रांमध्ये गौण असेल असे तिला वाटते ; पण येथे सगळे उलटे जाणवते.

शाकाहार, मांसाहार याबद्दलची मते विस्ताराने येतात. त्याला भारतातल्या राजकारणाची पार्श्वभूमी जोडली जाते. 'असं नाही ना होत. तुम्ही दुसऱ्या देशात गेलात आणि तिथं त्यांनी सांगितलं तुम्हाला की, तुमचं शाकाहारी असणं आम्हाला मान्य नाही. जसे आम्ही बीफ खातो, तसे तुम्ही देखील खा; तर काय होईल?'
'असं कसं होईल?'

'तेच तर. असं नाहीच होणार आणि होताही कामा नये. तसं झालं तर आपण सगळ्यांनी भांडायला हवं त्यांच्याशी; पण तसं होत नाही आज. तुम्हाला माहीत आहे, सुनेत्राजी, जिथं बीफ खाल्लं जातं, त्या देशातही आज, जैन फूड मिळतंय. अगदी अरबांच्या एमिरेट एअरलाईन्समध्ये तुम्हाला हिंदू आणि जैन शाकाहारी जेवण देतात. ते असं नाही ना म्हणत, आम्ही मांस खातो, मग तुम्हाला आमच्या विमानातून यायचं असेल, तर तेच

खावं लागेल म्हणून. उलट भारतीयांना शाकाहारीच नाही, तर कांदा, लसूण नसलेलं जैन जेवणही ते आदराने देताहेत.' (पृष्ठ क्रमांक ११८)

आजचे राजकारण, संस्कृतीची शोधपाहणी जाणून घेण्याचा प्रयत्न सध्याचे लोक मध्यमवर्ग व उच्च वर्ग काय बोलतात, प्रत्येकाच्या घरात कसे वातावरण आहे कारण नजमा ही ज्या मित्रांच्या घरी जाते तिथे ती त्यांचा दिवाणखाना, बेडरूम, किचन अशा ठिकाणी वावरते जेएनयुत शिकलेली अतिशय धूर्त व हुशार असणारी नजमा हिला सर्व गोष्टी न बोलता समजत जातात. तिचे हे समजणे म्हणजे लेखिकेने वाचकांना केलेले विश्लेषण आहे. आज संवाद कसा तुटत चालला आहे. माणसे समाजमाध्यमांमुळे जवळ येत आहेत हा आभास आपल्याला त्रासदायक ठरतोय. आपण जवळ आलो तरी आधीच आपल्यात ज्या भिंती निर्माण झाल्या आहेत त्याचे वास्तव प्रत्यंतर या कादंबरीत येते.

विभक्त कुटुंब पद्धतीचे होणारे परिणाम काही ठिकाणी दिसतात, तर काही ठिकाणी विभक्त कुटुंबातही संस्कार कसे पेरले जातात याचे प्रत्यंतर वाचकाला येते. जेकबच्या घरी गेल्यावर क्लारा व ऋषिकेश तिच्याशी किती प्रेमाने व आपुलकीने वागतात हे लेखिकेला दाखवून द्यायचे आहे. कुटुंबात जसे वातावरण आहे त्याच वातावरणाचे पुढच्या पिढ्यांमध्ये संक्रमण होताना दिसते.

संवेदना हरवलेल्या व मुखवटे परिधान केलेल्या काळात आपण जगत आहोत. ९० च्या आधीच्या काळात किती सजीवता होती. २०१४ पर्यंत अजून मोठा बदल होत गेला आणि २०१४ नंतरचे सामाजिक व सांस्कृतिक वातावरण कसे आहे? समाजमाध्यमांमुळे आपल्यावर कसे परिणाम झाले? विरेचन हा अतिशय महत्त्वाचा भाग आज बंद झाला आहे. माणसाने व्यक्त व्हायला हवे; पण तो आज कसा मनाशीच न व्यक्त झाल्याने खचतो आहे. या खचलेपणाचे काय परिणाम होणार आहेत तेही या कादंबरीच्या माध्यमातून वाचकापर्यंत लेखिकेने पोहोचवले आहे. माणसांमध्ये थिजलेपण व गोठलेपण आले आहे.

स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा करीत असतानाच स्वातंत्र्याचे प्रश्न आपल्याला भेडसावत आहेत. इथे स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न नाही तर स्त्रियाच आपले स्त्रीत्व आपसूक मान्य करताना दिसतात. त्यात या उच्चशिक्षित स्त्रियांना आनंद वाटतो आहे. समकालीन राजकारण व सत्ताकारणाने स्त्रिया, सामान्य माणूस व बौद्धिक वर्ग संकुचित झाला आहे. या कादंबरीतील जी पात्रे आहेत ती आपल्याला प्रातिनिधिक स्वरूपात बघायला मिळतात. या सर्व पात्रांच्या मनावर साहित्याचे गारूड निर्माण करणाऱ्या लेखक कवींचा उल्लेखही येथे येतो. त्यामध्ये इस्मत चुगताई, इलिएट, डी.एच लॉरेन्स, डोस्टोव्हस्की, हेमिंग्वे, सार्त्र, कामू, विंदा, सुर्वे, ढसाळ, कोलटकर, डहाके, मंटो, अमृता प्रीतम, पाश, केदारनाथ अशा मराठी, हिंदी, इंग्रजी साहित्यिकांचा उल्लेख महत्त्वाचा वाटतो.

'थिजलेल्या काळाचे अवशेष' या कादंबरीतील पात्रांच्या जीवनातल्या लयी या कादंबरीत नीरजा यांनी बेमालूमपणे रेखाटल्या आहेत. कादंबरीचे कथानक जरी एकूण वीस दिवसांत घडत असले तरी या कादंबरीचा अवकाश हा अतिशय विस्तृत आहे. ऐंशीच्या दशकात शिक्षण घेणारे मित्रमैत्रिणी व त्यांच्या जेएनयुच्या शिक्षण घेतलेल्या काळाची या एकूण वीस दिवसांना पार्श्वभूमी आहे. त्याबरोबरच त्यांनी अभ्यासलेले समाजसुधारक, लेखक, कवी, विचारवंत या सर्वांच्या विचारांचा वारसा या सर्वांना लाभलेला आहे. त्यामुळे कादंबरीचा अवकाश हा विस्तारत जातो. या कादंबरीतील मजकूर हे निवेदनयोग्य आहे. संवाद जरी जास्त येत असले तरी तीच एक संवादात्मक निवेदन पद्धती लेखिकेने अतिशय खुबीने वापरली आहे, त्यामुळे कादंबरी ही खुलत जाते व एक प्रकारे वाचकांची उत्सुकता वाढवते. आता पुढे काय? पुढचे भेटणारे पात्र कसे असेल? असे अनेक प्रश्न कादंबरी वाचताना वाचकांच्या मनात निर्माण होत जातात. कथानकामध्ये या सर्वांचा समावेश होतो. या कादंबरीतील कथानकामध्ये घटना, प्रसंग, पात्रे आणि निवेदनपद्धती अतिशय चपखलपणे वापरली आहे हे वाचकाला जाणवत राहते. हे सर्व घटक एकसंघपणे कादंबरीत येत असल्यामुळे या कादंबरीतील कथानकाला एक सुसूत्रपणा येतो.

कथानकामधील एक एक घटना व पात्रं उलगडत जातात व आजच्या काळाचा अवकाश स्पष्ट होत जातो. घटना व पात्र यांच्या परस्परसंबंधातूनच अनेक क्रिया प्रतिक्रिया घडताना दिसतात आणि या कादंबरीचे कथानक

पुढे सरकत जाते. कथानकाचा लहानात लहान घटक म्हणजे घटना असतात आणि अशा नैसर्गिक व मानसिक स्वरूपाच्या घटनांची संख्या कथानकामध्ये भरपूर असलेली आपणास दिसते.

कादंबरीत अल्प पात्रे असली तरी या पात्रांकडून विशिष्ट प्रसंगी, विशिष्ट ठिकाणी, विशिष्ट वेळी काही घटना घडताना आपल्याला दिसतात. या घटना घडण्यामागे काही उद्दिष्टे असतात किंवा यांना आपण उद्दिष्टप्रधान अनुभव असेही म्हणू शकतो. अमिताच्या घरी पार्टीत घडलेली घटना येथे आपल्याला उदाहरण म्हणून देता येईल.

'तिच्यासोबत तिच्या सगळ्या मैत्रिणींनी चिअर्स केलं आणि सगळ्या म्हणाल्या, 'मॅमनं किती छान डिफाईन केलं तुम्हाला. तुम्हीही बोला ना काहीतरी.'

'हो हो, बोला ना,' सगळ्या ओरडल्या. अमिताच्या काही मैत्रिणी तर म्हणाल्या, 'नजमाजी, तुम्ही कोणत्याच अँगलनं मुस्लीम नाही वाटत. इतक्या मॉडर्न दिसता आहात आणि अमिता तर म्हणते, तुमचे विचारही खूपच आधुनिक आहेत. दॅट इज व्हेरी रेअर.'

नजमाला सावरायला थोडा वेळ लागला. खरं तर पार्टी सोडून जावंसं वाटत होतं तिला; पण तिनं आवंढा गिळला आणि हसली ती मोकळेपणानं आणि म्हणाली, 'अमिता इतकं बोलली आहे आणि तुम्ही इतका आग्रह करता आहात की, आता मला बोलायलाच लागेल.'

आणि येथे नजमा जे काही बोलते तो एक उद्दिष्टप्रधान अनुभव म्हणूनही आपल्याला येथे त्याचा विचार करता येतो कारण घटना हा एक अनुभवच असतो. फक्त येथे कल्पकता व प्रतिमा यांची कसोटी महत्त्वाची असते आणि या कसोटीत लेखिका उतरल्या आहेत. लेखिकेने केवळ घटना एकापाठोपाठ एक अशा मांडल्या, तर त्याचे कथानक तयार होणार नाही कारण, कथानकाला अनुक्रम महत्त्वाचा नाही तर कार्यकारणभाव महत्त्वाचा आहे जो या कादंबरीत आपणास क्षणाक्षणाला जाणवतो. या कादंबरीतील कथानकाची व्याप्ती आपणास शेवटपर्यंत जाणवते. एका घटनाप्रसंगानंतर दुसरा घटनाप्रसंग अशी घटनांची साखळीबद्ध रचना लेखिका नीरजा यांनी केली आहे.

आशयाला अनुसरून भाषा वापरत लहान लहान वाक्यांच्या आधारे निवेदनाला गती दिली आहे. कथानकात वाचकाला कादंबरी वाचताना या वैविध्यपूर्ण घटनाप्रसंगात उत्सुकता, हुरहूर व आश्चर्य वाटत राहते. उदा. मृणालचे प्रेमप्रकरण, गोवर्धनला आवडणारी नजमा, इरफानचा झालेला अपघात, समाजमाध्यमांचा अवास्तव वापर, त्यांचे दुष्परिणाम, असंवेदनशील वृत्ती प्रवृत्ती आपल्याला मनात हुरहूर निर्माण करतात. आपल्या मनातील जाणीव वा तशा आठवणी जागृत होऊन कादंबरीत पुढे काय याची उत्सुकता वाढत जाते. या कादंबरीत उपकथानकाचा वापर लेखिकेने केला आहे. मुंबईत भेटणारा प्रशांत नावाचा साहित्य अकादमी प्राप्त लेखक असेल किंवा नजमाला ज्या सलीममामूने मदत केली त्या सलीममामूकडे अचानक गेल्यावर सलीममामूचा अन्तकाल झाला हे तिला कळणे अन् तिचे सैरभैर होणे असो. ही काही उपकथानके या कादंबरीत येताना दिसतात. या उपकथानकांमुळे कथानकामधील रहस्यमयता वाढली आहे.

या कथानकाला गतिमानता आणण्यासाठी या कादंबरीतील 'पात्रं' महत्त्वाची आहेत. या कादंबरीत मुख्य पात्रे ही नऊ आहेत; पण ज्या सात मित्रांच्या घरी नजमा जाते त्या घरातील व्यक्तींचा संबंध अनायासे दोन दिवस त्या घरात राहिल्याने नजमाशी येतो. ती पात्रे पण येथे महत्त्वाची आहेत. पुरुष मित्रांच्या घरी त्यांच्या बायकांशी ती आपले मैत्रीचे संबंध प्रस्थापित करते त्यामुळे तिला ते घर व बदललेले मित्र मैत्रिणी कळत जातात. ज्या मैत्रिणी आहेत त्या आपसूकच आपल्या नवऱ्याचा स्वभाव त्याचे वर्तन व्यवहार विशद करतात. एकूणच सर्व पात्रांचा धांडोळा लेखिकेने घेतला आहे. यामध्ये काही गौण पात्रे असली तरी त्यांची व्यक्तिमत्त्वे अधिक स्पष्टपणे लेखिकेने येथे मांडली आहेत. उदा. सलीममामू व इरफान या दोन पात्रांचा प्रत्यक्षात वाचकांशी काहीही संबंध येत नाही; परंतु कथनकार त्यांच्याविषयी तपशील कथन करताना त्यांचे एक व्यक्तिमत्त्व वाचकाजवळ उभे करते. त्यातून या दोन्ही पात्रांची एक वेगळी ओळख वाचकाच्या मनात निर्माण होत असते. प्रथमतः नजमाला भेटणारी मृणाल ही मुंबईत राहणारी आहे. मृणालची अस्वस्थता तिचा नवरा संजय त्याला काय सांगावे? हा पडलेला प्रश्न असे द्विधा मनःस्थिती असणारे पात्र येथे आपणास दिसते. ऐंशीच्या

दशकातील मृणाल अन आत्ताची मृणाल अशा दोन मृणाल लेखिका आपल्यापुढे उभ्या करतात. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक असलेल्या प्रशांतला नजमाला मृणाल भेटवते. पुरस्कारवापसी हे प्रकरण या प्रशांतकडून नजमा सविस्तर समजावून घेते. त्या काळात काही लेखकांनी का पुरस्कार वापस केले नाहीत, त्यांची भूमिका काय होती हे इथे लेखिकेला स्पष्ट करायचे असल्याने लेखिकेने ट्वीस्ट देऊन अतिशय खुबीने येथे प्रशांत हे पात्र उभे केले आहे.

गोव्यात राहत असलेली परोमिता गोव्यात सामाजिक काम करीत असते. नीतिमूल्य जपून समाजकार्याचा घेतलेला वसा ती चालवत असते. तिचा जोडीदार असलेला राजदीप तिला प्रत्येक कामात कसा सहकार्य करतो. नजमा हे मुख्य पात्र लेखिकेने असे रेखाटले आहे, की तिला भेटणाऱ्या सर्वच पात्रांचा वकूब त्यांच्या नुसत्या बोलण्यानेच तिला कळत जातो. केरळात राहणारा जेकब हा नजमाचा धर्माने ख्रिश्चन असणारा मित्र होय. त्याच्या बायकोचा समाजकार्य करत असताना खून झालेला असतो; पण तो याविषयी आपल्या मैत्रिणीजवळ चकार शब्द काढीत नाही; पण कुठलेही भय न बाळगता एका ध्येयाने प्रेरित होऊन त्याने आपले काम चालू ठेवलेले आहे. जेकबची मुलगी क्लारा, जावई ऋषिकेश हे अतिशय आज्ञाधारक व स्वभावाने गोड दाखवलेले आहेत. मुलांचे घडणे व बिघडणे हे घरातील वातावरणात कसे दडलेले आहे याचीही ओळख नजमा आपल्या कथनातून करून देते. क्लारा दहावीत असताना तिची मम्मी गेली. आईविना लेक जेकबने प्रेमाने वाढवली व संस्कार केले. इथली हुंडा व मातृसत्ताक पद्धत आपल्याला पात्रांबरोबर संस्कृती व समाजमनाचे अलगद दर्शन घडवून आणते.

कर्नाटकात राहणारी अमिता बँकेत नोकरी करते. तिचा नवरा व्यंकट आर्किटेक्ट आहे. अमिता ही गेल्या चाळीस वर्षांच्या अवधीत स्वत:त मश्गुल झालेली आहे. तिला बघताच नजमा तिच्यातील झालेला बदल टिपते. माणसे कशी बदलतात, त्यांच्यात होणारा बदलाचा अचूक अंदाज नजमाने घेतला आहे. अमिता इतरांपेक्षा स्वतःत रममाण होते. नजमाची परवानगी न घेता अमिताने आपल्या मैत्रिणींसाठी एक पार्टी ठेवली होती. या पार्टीत अमिता काँग्रेस विरोधात केलेली आंदोलने व आताचे सरकार आपण कसे आणले आहे असे उद्‌गार काढते. खरे तर प्रत्येक सरकार मग ते कुठल्याही पार्टीचे असो त्याच्या चुकीच्या धोरणाविरोधात लढणारे जेएनयु विद्यापीठ व तेथील वैचारिक वारसा लाभलेले विद्यार्थी असतात; पण येथे अमिताचे अपरिपक्व विचार ऐकून नजमा विचारात पडते. एकूणच लेखिकेने काळाच्या ओघात वैचारिकतेत कसा उलटा बदल होत जातो याचे एक चपखल उदाहरण अमिता या पात्राच्या निमित्ताने येथे दिले आहे. त्या पार्टीत काँग्रेसधार्जिणे व कंझर्व्हेटीव्ह असणारे मुस्लीम आपल्या देशाशी कशी बेईनामी करतात हा प्रश्न अमिताच्या मैत्रिणी उपस्थित करतात. येथूनच पार्टीचा बेरंग होतो. उपस्थित प्रश्नांची उत्तरे देताना कथनकार नजमा मुस्लिमांनी या देशासाठी दिलेले योगदान सांगतानाच लोकशाही, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक न्याय, आर्थिक समानता, नेहरूंची समाजवादी लोकशाही, बुद्धिवादी विचार, सरकारची पॉलिसी, माजलेला भ्रष्टाचार या सर्व संज्ञा, त्यांचे अर्थ याविषयी दीर्घ भाष्य करते, 'सगळे हिंदू किंवा सगळे ख्रिश्चन पुरोगामी नसतात किंवा सगळे इस्लामधर्मीय सनातनी नसतात कारण तुम्ही कोणत्याही धर्मात जन्माला आलात, तरी अंधश्रद्धा आणि कर्मकांडाचे तुम्ही सगळेच बळी असता. प्रमाण कमी-जास्त असू शकेल; पण ते जगभर सगळीकडे सापडतात.आपल्याच देशात एकेकाळी म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात असो की, नंतर असो बऱ्यापैकी लोक प्रोग्रेसिव्ह विचारांचे होते आणि मुख्य म्हणजे सगळ्या धर्मांत होते. तुम्हाला कल्पनाही नसेल, पण स्वातंत्र्यपूर्व काळात साधारण १९३६ च्या सुमारास प्रोग्रेसिव्ह रायटर्स मुव्हमेंट सुरू झाली होती आणि त्याचे फाऊंडर मेंबर अहमद अली आणि सज्जाद जहीर हे दोन मुसलमान लेखकच होते. आमचा मंटो, फैज अहमद फैज, अहमद नजीम कासमी, सुलताना जाफरी, विश्वामित्र आदील, अली सरदार जाफरी, कृष्णा चंदर, महेन्द्रनाथ, मुमताझ हुसेन, राजिंदर सिंग बेदी, साहीर लुधियानवी, हबीब तन्वीर, इस्मत चुगताई असे अनेक जण या ग्रुपला जॉईन झाले होते. याच्या पहिल्या कॉन्फरन्सला प्रेमचंद, मुल्कराज आनंद, युसुफ मेहरअली, जयप्रकाश नारायण असे दिग्गज लोक आलेले होते आणि दुसऱ्या कॉन्फरन्सला रवींद्रनाथ टागोरांनी ॲड्रेस केलं होतं. पुढे आम्ही ज्या

काळात मोठे होत होतो, त्या वेळीही असे अनेक लोक होते. कैफी आझमी असोत, अमृता प्रीतम असो की निदा फाजली-यातली अनेक मंडळी मुसलमानच होती ना? दिल्लीत तर त्या काळात पुस्तकांच्या दुकानात लोक जमायचे. पार्ट्या करण्यासाठी नाही, तर वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करायला. खऱ्या अर्थानं 'चायपे चर्चा' होत होत्या तेव्हा. वैचारिक देवाणघेवाण होत होती, माणसांसाठी माणसांविषयी लिहिणारी माणसं होती ती. ते कोणा धर्माचे किंवा जातीचे लोक नव्हते. निव्वळ माणसं होती ती. आजही अनेक जण लिहिताहेत. सज्जाद जहीर यांची मुलगी नूर जहीर तर उत्तम लेखिका आहे आजच्या काळातली. शहाबानो खटल्यानंतर लिहिलेलं 'माय गॉड इज अ वूमन' हे तिचं गाजलेलं पुस्तक तुम्ही किती जणांनी वाचलं आहे मला माहीत नाही; पण ते स्त्रीच्या सगळ्या प्रश्नांना भिडणारं पुस्तक आहे. वेगळ्या उंचीवर घेऊन जाणारं लेखन करते आहे ती सतत. साहित्यात या प्रगतिशील लोकांनी क्रांती केलीच; पण थिएटरमध्येही क्रांती केली होती या लोकांनी. सिनेजगतावर राज्य केलं अनेकांनी.' (पृष्ठ १००-१०१)

अजूनही बरेच दीर्घ भाष्य नजमा करते. मुस्लिमांची लग्नं, राज्यांची पूर्वीची जीवनपद्धती व परदेशातली स्थिती याचाही ती आपल्या भाष्यात आढावा घेते आणि इथेच पार्टीच्या रंगाचा बेरंग होतो. दुसऱ्या दिवशी नजमा सारे सांभाळून घेते व नॉर्मल होते. एकूणच या पात्रांचा वास्तव अंदाज येथे येण्यासाठी हे नजमाचे दीर्घ भाष्य महत्त्वाचे वाटते.

दिनेश हा जैन असल्याने शाकाहारी आहे. त्याची बायको सुनेत्राने संगमनेर महाविद्यालयात फिलॉसॉफी विषय घेऊन पदवीचे शिक्षण घेतले आहे. तिला जेव्हा दिनेश नजमा या आपल्या जेएनयु मैत्रीणीविषयी सांगतो तेव्हा तिच्या क्रिया-प्रतिक्रिया येथे उमटतात. 'ती राहायला घरीच येणार, म्हटल्यावर सुनेत्राला सांगावंच लागलं त्याला सगळं. वरुण आणि निधी एकदम एक्सायटेड होते. डॅडाची मैत्रीण येणार म्हणून; पण सुनेत्रानं विशेष रस दाखवला नाही. तिच्या कपाळावर आठ्याच होत्या खूप. तिच्या शाकाहारी घराला मांसाहारी बाट लागणार म्हणून. तेवढंच नव्हतं ते, हे माहीत होतं दिनेशला; पण त्यानं ते जाणवू दिलं नाही. 'अशी कोणी मैत्रीण असूच कशी शकते तुला?' हा तिचा साधा सरळ प्रश्न होता त्याला, आणि त्याचं उत्तर काय द्यायचं, हे सुचत नव्हतं त्याला. शेवटी पोरंच आली मदतीला धावून. 'अगं मम्मा, कॉलेजात असा विचार नाही करत कोणी. कोणाची धर्म, जात विचारून होते का मैत्री?' असं विचारलं निधीनं, तेव्हा तिच्यावरच उसळली. 'आम्ही गेलो नाही का कधी कॉलेजात? मीही बीए फिलॉसॉफी केलं होतंच की.' निधी फक्त हसली मग आणि मग तिच्याकडे दुर्लक्ष करून दिनेशकडे पाहून डोळे मिचकावत म्हणाली, 'डॅडा, मला पाहायचीच आहे कशी आहे तुझी ही मैत्रीण.' (पृष्ठ क्र.१०८-१०९) येथे फिलॉसॉफी विषय घेऊन वास्तव जीवनात शिक्षणाचा काहीही संबंध नाही एकूणच वैचारिकतेचा अंतर्विरोध या ठिकाणी लेखिकेने घडवून आणला आहे. यावरून असे दिसते की, लेखिकेने निवडलेली पात्रं कादंबरीत अपेक्षित कार्य करताना दिसतात.

मनोहर हा मूळचा कोकणातला; पण आता कोलकाता येथे स्थायिक झाला आहे. नजमा ही त्याची व गोवर्धनची अतिशय खास अशी मैत्रीण होती. मैत्रीण म्हणजे एकतर्फी दोघांचे नजमावर प्रेम असते. नजमाला हे त्या काळात माहीत असते पण यांचे स्वभावगुण तिला प्रेमासाठी व लग्नासाठी योग्य वाटत नाही. त्यामुळे याची पुसटशी कल्पना ती त्यांना येऊ देत नाही. २०१७ मध्ये आलेल्या 'आता ती काय करते' या चित्रपटाला साजेसे काहीसे वातावरण आपल्याला येथे जाणवते. दहा वर्षांपूर्वी इरफानबरोबर कलकत्त्याला येऊन मनोहरला ती भेटून गेली होती; पण आता एकटी अन् निवांत येतेय म्हणून त्याला अत्यंत आनंद झाला होता. गोवर्धन व अनघा दिल्लीत नजमाला भेटतात. गोवर्धन हा एका मोठ्या पार्टीचा नेता आहे, खासदार आहे. त्याला सरकारी घर मिळालेले आहे. तो सत्ताधारी पार्टीचा नेता असल्याने त्याचे पात्र लेखिकेने प्रखरतेने रेखाटले आहे. आजच्या हिंदुत्ववादी नेत्यांच्या तोंडी असणारे संवाद त्याच्याकडून आपल्याला ऐकायला मिळतात. धर्म, जात, संस्कृती याच्यावर नजमा व गोवर्धन यांच्यामध्ये खडाजंगी होते. पाकिस्तानमुळे भारतावर होणाऱ्या अतिरेकी कारवाया त्यात एका विशिष्ट धर्माचे लोक कसे कारवाया करतात याचे पुरावे गोवर्धन देतो. शेवटी त्याच्या राजकीय पार्टीच्या अजेंड्याप्रमाणे तो

बोलत राहतो. लेखिकेने अशा पात्रांच्याद्वारे आजची वास्तव स्थिती अधोरेखित केली आहे. नजमा आपल्या संवादाने हे सर्व गोवर्धनकडून वदवून घेते. येथे खऱ्या अर्थाने पात्र व संवादातून वाचकांना देशातील आजच्या राजकीय परिस्थितीचे स्पष्टीकरण दिले जाते. शेवटी आंबेडकरवादी असणारा मृणालचा पूर्वाश्रमीचा प्रियकर प्रणव न्यूझीलंडवरून भारतात एका कार्यशाळेसाठी आलेला असतो. त्याला सरप्राईज म्हणून गोवर्धन सर्व वर्गमित्रांच्यासमोर उभा करतो. त्या वेळचे चित्रण लेखिकेने अतिशय भावनावश असे केलेले आहे

'आपल्या ग्रुपमधला आणखी एक माणूस नाही इथं. कुठं आहे तो सध्या ?' दिनेश म्हणाला.

तसा मनोहर म्हणाला, 'तो इथं नाही. न्यूझीलंडला आहे.' 'हे तुला कोणी सांगितलं, मनोहर?' मागून आवाज आला आणि सगळ्यांनी एकदम वळून पाहिलं. समोर प्रणव उभा होता.

'ओ माय गॉड!' म्हणत सगळेच ओरडले. 'सो धिस इज द सरप्राईज. म्हणून तू फक्त सैफला मिस करतो म्हटलंस!' म्हणत एकच कल्ला केला सगळ्यांनी.

साधा टी-शर्ट आणि जीन्स घातलेला सडसडीत शरीरयष्टी असलेला. डोक्यावरच्या आणि दाढीतल्या केसांना किंचित रुपेरी झाक आलेला प्रणव समोर पाहून सगळ्यांनीच डोळे विस्फारले. प्रत्येक जण जाऊन त्याला घट्ट भेटला. मृणालनं जवळ जाऊन त्याच्याशी हात मिळवले, तेव्हा नजमा सिगारेट विझवत होती हातातली. 'काय नजमा, तू नाही का भेटणार?'

'बायकांनी स्मोक केलेलं आवडायचं नाही तुला त्या काळात. म्हणून सिगारेट विझवत होते.' ती हसून म्हणाली. तसा तो हसून म्हणाला, 'नाऊ, आय डोट माईंड. माझी बायको चेनस्मोकर आहे.' (पृष्ठ क्रमांक २०३-२०४) एकूणच विचारातला व जगण्यातला विरोधाभास तसेच कालावकाश बदलला, की माणसे कशी बदलतात हे या प्रणवच्या बोलण्यावरून सर्वांच्या लक्षात येते. नजमा सोडून प्रत्येकाच्या जीवन जाणिवांमध्ये मोठा बदल झाला आहे हेच या पात्रांच्या संवादावरून आपल्या लक्षात येते. प्रत्येक पात्राला लेखिकेने एक विशिष्ट असे व्यक्तिमत्त्व दिलेले आहे. आपले विविध अनुभव वा जीवनजाणिवा या विविध पात्रांच्यामध्ये

**प्रत्येक पात्राला लेखिकेने एक विशिष्ट असे व्यक्तिमत्त्व दिलेले आहे. आपले विविध अनुभव वा जीवनजाणिवा या विविध पात्रांच्यामध्ये आपणास दिसतात. लेखिकेने ही पात्रे निर्माण करताना काही विशिष्ट हेतू समोर ठेवून पात्रे निर्माण केली आहेत. नजमा हे मुख्य पात्र म्हणूनच वाचकावर एक विशिष्ट प्रकारचा प्रभाव टाकते. या कादंबरीतील काही शहरेसुद्धा आपल्याला पात्ररूप वाटू लागतात. या सर्व शहरांना असणारा इतिहास, संस्कृती, चरित्र व या शहरातील महत्त्वाच्या व्यक्ती वा इतर काही असणारे संदर्भदेखील पात्ररूप झालेले आहेत. जेएनयु विद्यापीठसुद्धा आपल्यासमोर एक पात्र म्हणूनच भावते. जीवनव्यवहाराच्या रंगढंगाप्रमाणेच या पात्रांनाही रंगढंग प्राप्त झाल्यामुळे एक वेगळे व्यक्तिमत्त्व लाभले आहे.**

आपणास दिसतात. लेखिकेने ही पात्रे निर्माण करताना काही विशिष्ट हेतू समोर ठेवून पात्रे निर्माण केली आहेत. नजमा हे मुख्य पात्र म्हणूनच वाचकावर एक विशिष्ट प्रकारचा प्रभाव टाकते. या कादंबरीतील काही शहरेसुद्धा आपल्याला पात्ररूप वाटू लागतात. या सर्व शहरांना असणारा इतिहास, संस्कृती, चरित्र व या शहरातील महत्त्वाच्या व्यक्ती वा इतर काही असणारे संदर्भदेखील पात्ररूप झालेले आहेत. जेएनयु विद्यापीठसुद्धा आपल्यासमोर एक पात्र म्हणूनच भावते. जीवनव्यवहाराच्या रंगढंगाप्रमाणेच या पात्रांनाही रंगढंग प्राप्त झाल्यामुळे एक वेगळे व्यक्तिमत्त्व लाभले आहे. या कादंबरीत अशी ही व्यक्तिमत्त्वे पात्ररूपाने वावरत असताना वाचकांना जाणवतात. तसेच लेखिकेने या पात्रांच्या इच्छा, आकांक्षा, क्रिया, प्रतिक्रिया यांचे दर्शन वाचकांना घडविले आहे. लेखिकेचा जो विशिष्ट दृष्टिकोन आहे तो त्यांनी या पात्रांच्याद्वारे वाचकापर्यंत पोहोचवला आहे. भारत देश विविधतेने नटला आहे; पण त्याला

असणाऱ्या त्याच्या खाद्यसंस्कृतीचे दर्शनही लेखिकेने येथे घडवले आहे.

वाचकाजवळ घटनांची मालिका उभी करण्यासाठी निवेदन अतिशय महत्त्वाचे आहे. कादंबरीमध्ये निवेदन करण्यासाठी तृतीय पुरुषी निवेदक असला तरी काही ठिकाणी पात्रापात्रांमध्ये संभाषण व संवाद आहेत. तसे संवादाचे प्रमाण कादंबरीत जास्त आहे. एकूण २० दिवसांत घडणारे कथानक व त्यात मित्रांना भेटणारी नजमा त्यामुळे बऱ्याच वेळा संवाद येत जातात. काही ठिकाणी मात्र एकाच पात्राच्या मनातील स्वभाषण आलेले आहे. काही घडलेल्या घटनाप्रसंगांवरची भाष्येही आहेत. या कादंबरीमध्ये काही ठिकाणी कथन आहे तर काही ठिकाणी चित्रण दिसते. संवादाचे प्रमाण थोडे जास्त असल्याने काही प्रसंग नाटकासारखे समोर दिसतात.

एकूणच निवेदन, पात्रं याबरोबर कादंबरीचा कालावकाश हा महत्त्वाचा आहे. या कादंबरीत येणाऱ्या प्रत्येक शहराचा कालावकाश हा वेगळा आहे. मुंबईत राहणाऱ्या माणसांचा काळ हा अधिक घाईगडबडीचा, घड्याळाशी बांधलेला आहे, तर केरळमध्ये राहणारा जेकब यांचा काळ अधिक संथ, नियमित असा आहे.

'थिजलेल्या काळाचे अवकाश' या कादंबरीमध्ये नाटकाप्रमाणे चटकदार असे संवाद तर आहेतच; पण शिवाय अनुरूप शब्दांच्याद्वारे अनुकूल वातावरणनिर्मिती केलेली आहे. तसेच पात्राचा स्वभाव, त्याचा परिचय, विविध घटनांचे निवेदन अत्यंत रेखीव व समर्पक शब्दांनी केले आहे, की ती पात्रं व घटनाप्रसंग वाचकाच्या डोळ्यांसमोर जसेच्या तसे उभे राहतात. उदा. 'कधीपासून उभी होती नजमा स्मोकिंग झोनमध्ये. जवळजवळ एक पाकीट संपायला आलं होतं, तरी मृणालचा पत्ता नव्हता.' (पृष्ठ क्रमांक ३) आपल्या डोळ्यांसमोर सिगारेट ओढणारी नजमा उभी राहते. एकूणच कादंबरीमध्ये संवादाची भाषा वापरातील व स्वाभाविक असल्याने सहज सुंदरता व स्वाभाविकता हे दोन गुण या कादंबरीतील भाषाशैलीचे आहेत. या कादंबरीतील भाषेमुळे कादंबरी वाचताना वाचकाच्या डोळ्यांसमोर असे अनेक प्रसंग उभे ठाकतात. हे प्रसंग आपल्या देशातील २०१४ नंतर निर्माण झालेली वास्तव स्थितीही प्रकट करतात. भारतात लोकशाहीचे राष्ट्र आहे; पण लोकशाहीचा कसा घडोघडी येथे खून होतो आहे याचे प्रत्यंतर व वास्तव स्थिती वाचकाला जाणवते. या कादंबरीत केवळ घटनाच येत नाहीत तर लेखिकेचा समृद्ध व समग्र जीवनानुभव आपल्या भाषेच्या माध्यमातून समोर येताना दिसतो. वास्तव स्थितीचे वर्णन व एक वेगळा कलात्मक बाज जाणवतो. लेखिका या इंग्रजी साहित्याच्या अभ्यासिका असल्याने व कवयित्री, कथाकार व ललित लेखन अशा लेखनाच्या विविध क्षेत्रांत प्रदीर्घ लेखन करीत असल्याने त्या अनुभवांची व्यापकता, भाषेचा समृद्धपणा, आशयनिष्ठ अभिव्यक्ती व अत्युच्च साहित्यमूल्यं यामुळे 'थिजलेल्या काळाचे अवशेष' ही कादंबरी ही एक आगळी वेगळी कलाकृती आहे. लोकशाहीत बहुमताला महत्त्व असते. वैचारिक, डावी विचारसरणी व पुरोगामी लोक सुधारकी विचार मांडत असतात. नवा विचार मांडतात; पण याच नव्या विचाराला समाजातील काही जण विरोध करतात. आजचे सुधारणावादी विचार उद्या बदलतीलही; पण आज त्यांना विरोध असतो. अगदी हाच २०१४ नंतरचा आंतरविरोध व सामाजिक, राजकीय बदलाचा आडवा-उभा छेद घेण्याची नीरजा यांची 'थिजलेल्या काळाचे अवशेष' ही कादंबरी आजच्या वास्तव सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीच्या वास्तवतेचा उद्गार ठरेल, यात शंका नाही.

**संदर्भ :**


१. थिजलेल्या काळाचे अवशेष, नीरजा, राजहंस प्रकाशन, ऑगस्ट २०२२
२. मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा: डॉ. रवींद्र ठाकूर, दिलीपराज प्रकाशन
३. मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा: डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, मेहता पब्लिशिंग हाउस
४. कादंबरी समीक्षा व स्वरूप: डॉ. द. भि. कुलकर्णी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.



**डॉ. प्रकाश शेवाळे**
मराठी विभाग, म.गांधी विद्यामंदिर संचलित, लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी,
नाशिक- ४२२००३ । भ्र:८९७५५५५८१५
इमेलः prof.prakashshewale@gmail.com